आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र.५०

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – सुखदेव भाऊ पवार

वय – ६१ वर्षे, व्यवसाय – नोकरी

राहणार–बाभुळवाडे, ता.पारनेर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>**–

आरोपीस मी सेंट्रल बँकेच्या माध्यमातुन ओळखतो. आरोपी सेंट्रल बँकेत कोणत्या पदावर आहे हे मला माहीत नाही. मी क्रांती शुगर कारखाना देवीभोयरे येथे टेलीफोन ऑपरेटर म्हणुन कामास होतो. माझे सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथे सेव्हींग खाते होते. दि.१/१२/२०१९ रोजी मी सेंट्रल बँकेत गेलो होतो. मला कॅशीयर व गौतम जाधव यांनी दोन एफडी करण्यापेक्षा एक एफडी करा असे सांगितले. त्यावरुन मी रु.९,२२,०००/– ची एक एफडी एक वर्षासाठी केली. माझी रु.९,२२,०००/– ची एफडीची पावतीवर गौतम जाधव व कॅशीयर बोरुडे यांनी सही घेतली. ती पावती मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला ती पावती दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. ती पावती मीच भरली होती. त्यास **नि.५१** देण्यात येते. आता मला रु.९,२२,००० ची माझे नावे असलेली दि.१/१२/२०१९ रोजीची एफडीची पावती दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यास **नि.५२** देण्यात येते. त्यानंतर मला परत त्यांनी पावती रिन्यु करुन दिली. त्यानंतर बँकेत घोटाळयाबाबत मला कळाल्यावर मी बँकेत चौकशी केली असता माझ्या खात्यावर रक्कम नव्हती. मी सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथे माझी फसवणुक झाल्याबाबत अर्ज दिला. तो नगर येथील हेड ऑफीसला पुढे पाठवला. आता मला तो अर्ज दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असुन बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकुर मी लिहीला होता. त्यास **नि.५३** देण्यात येते. पोलीसांनी मला जबाबासाठी दोन अडीच महीन्यांनी बोलावले होते व त्यांनी माझा माझ्या सांगण्या प्रमाणे जबाब घेतला होता. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः</u>**

मी माझा जबाब पोलीसांना देतेवेळी वाचला होता. मला बँकेचे व्यवहार कळतात. हे म्हणणे खरे आहे की बँकेतुन पैसे काढायचे असतील किंवा भरायचे असतील तर बँकेच्या कॅशीयरशी भेटावे लागते. हे म्हणणे खरे आहे की मी ज्यावेळी बँकेत गेलो त्यावेळी मी कॅशीयर बोरुडे यांच्याशी भेटलो. हे म्हणणे खरे आहे की नि.५१ वरील पावती कॅशीयर बोरुडे यांनी सही करुन माझ्याकडे दिली. मी सांगतो की त्यावेळी आरोपी कॅशीयरसोबत होता. मला दरमहा साधारण रु.२७,०००/- पगार आहे.

प्रश्न- रु.९,००,०००/- ची तुमची पावती तुम्ही आयकर विभागाला दाखवली होती का?

उत्तर- दाखवण्याचा प्रश्न नाही कारण ती माझी एफडीची पावती होती.

नि.५३वरील अर्ज बँक मॅनेजरला मीच दिला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या अर्जानुसार माझी फसवणुक पुर्ण बँकेने केली होती. हे म्हणणे खरे आहे की नि.५३ वरील अर्जामध्ये गौतम जाधवचे नाव नमुद नाही.

प्रश्न- तुम्ही दिलेल्या अर्जामध्ये तुमची तक्रार बँक व कॅशीयर बोरुडे यांचेविरुध्द होती?

उत्तर- बँकेविरुध्द तक्रार होती मात्र कॅशीयर बोरुडे व गौतम जाधव हे दोघेही त्यावेळी बँकेत हजर होते.

हे म्हणणे खरे आहे की माझ्या तक्रार अर्जात रु.१०,४७,०००/- रकमेबाबत नमुद आहे. पोलीसांसमोरील दि.२/८/२०२२ रोजीच्या माझ्या जबाबात रु.९,२२,०००/- चा उल्लेख आहे.

प्रश्न- तुम्ही बँकेसमोरील अर्जात रु.१०,४७,०००/- नमुद केले आहे व पोलीसांसमोरील जबाबात रु.९,२२,०००/- नमुद केले आहे. पोलीसांना तुम्ही बँकेसमोरील अर्जात रु.१०,४७,०००/- नमुद असल्याचे जबाब देतेवेळी सांगितलते होते का

उत्तर- रु.१०,४७,०००/- माझ्या सेव्हींगचे आहेत. माझी फसवणुक मात्र रु.९,२२,०००/- ची केली होती.

पोलीसांसमोरील माझ्या जबाबात रु.९,००,०००/- चा उल्लेख आहे.

रु.९,२२,०००/- ऐवजी रु.९,००,०००/- चा का उल्लेख आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. मला माझे पैसे सन २०२२ साली दि.२०/८ किंवा २०/९ तारखेला परत मिळाले. व्याजासहीत मला जवळपास रु.१०,००,०००/- परत मिळाले होते.

प्रश्न- तुम्हाला जवळपास रु.१०,००,०००/- परत मिळाले मात्र पोलीसांसमोरील जबाबात तुम्हाला रु.९,००,०००/- मिळाल्याचा उल्लेख आहे. ते असे का नमुद आहे?

उत्तर- पोलीसांनी पुन्हा माझा जबाब घेतला नाही. मी एकदाच पोलीसांकडे जबाब द्यायला गेलो होतो.

हे म्हणणे खरे आहे की सहसा बँकेमध्ये पैसे काढायला गेल्यावर कॅशीयर त्या काउंटरवर बसलेला असतो.

प्रश्न- नि.५२ वरील एफडीची सेंट्रल बँक ऑफ इंडीयाच्या पावतीवर पहीली सही ब्रँच मॅनेजर व दुसरी सही असीस्टंट ब्रँच मॅनेजरची सही आहे?

उत्तर- नि.५२ वरील पावतीवर कोणी सहया केल्या याबाबत मला माहीती नाही.

प्रश्न- नि.५२ वरील सहया कॅशीयर बोरुडे यांच्याही असु शकतात?

उत्तर- त्याबाबत मी कसे काय सांगु शकतो.

(वरील प्रश्न विचारताना सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी presumption based question विचारता येणार नाही असा आक्षेप नोंदवला).

हे म्हणणे खरे आहे की बँकेतील पैसे देण्याघेण्याचे काम कॅशीयर पाहतो. पोलीसांनी माझा जबाब मला पैसे परत मिळण्या अगोदर घेतला होता.

हे म्हणणे खरे आहे की सेंट्रल बँकेच्या कर्मचा-यांनी पैश्यांचा अपहार केल्याबाबत मोठे आंदोलन झाले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मी बँकेच्या विरुध्द एक अर्ज केला होता व त्यानंतर मला बँकेचे वरिष्ठ अधिकारी भेटले होते व त्यांची व माझी चर्चा झाली.

प्रश्न- ती चर्चा झाल्यानंतर बँकेने तुम्हाला तुमचे पैसे परत दिले?

उत्तर- सात आठ महीन्यांनी परत दिले.

हे म्हणणे खरे नाही की बँक अधिका-यांनी मला आश्वासन दिल्याने मी पोलीसांसमोर खोटा जबाब दिला. हे म्हणणे खरे आहे की मी बँकेला दिलेले पैसे

बँकेने मला परत दिले होते. हे म्हणणे खरे आहे की मी उघडे मॅडम यांच्याशी संपर्क करण्या अगोदर बँकेने माझ्याशी पैसे काढण्या संदर्भात माहीती दिली नव्हती. माझा मोबाईल माझ्या खात्याला लिंक्ड आहे. तो मोबाईल नंबर ९५२७४४२०६१ असा आहे.

प्रश्न– पैसे काढुन घेतल्यानंतर तुम्हाला मोबाईलवर मेसेज आला होता का?

उत्तर– फिक्स डिपॉझीट झाल्याबाबत मला मोबाईलवर त्यावेळी मेसेज आला नव्हता.

हे म्हणणे खरे नाही की मी रु.९,२२,०००/– ची एफडी केली व ती रक्कम गौतम जाधवने परस्पर काढुन घेतली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील सांगितलेला मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की बँक अधिकारी यांनी मला पैसे परत देण्याबाबत आश्वासन दिल्याने मी गौतम जाधवविरोधात खोटी साक्ष देत आहे.

प्रश्न– गौतम जाधव याने अपहार केला हे तुम्हाला सांगता येणार नाही?

उत्तर– अपहार कोणी केला हे मी कसे सांगु शकतो, ते बँक ठरवणार.

प्रश्न– बँकेकडुन तुम्हाला पैसे परत मिळाल्याने तुमची कोणाही विरुध्द तक्रार राहीली नाही?

उत्तर– पैसे मिळाल्याने आता माझी तक्रार राहीली नाही.

हे म्हणणे खरे नाही की आरोपीलाशिक्षा व्हावी म्हणुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ३१/०८/२०२४.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.